निमखा-या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबत शासकीय धोरण- सुधारणा

## महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
पूरक पत्र क्रमांक निखायो १४९२/प्र.क्र. १६३/पदुम १२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ मार्च, २००३

पहा : शासन निर्णय ,कृषि व पदुम विभाग क्र. निखायो १४९२/प्र.क्र. १६३/पदुम १२, दि. २३ नोव्हेंबर, २००१

पूरक पत्रक :- कृषि व पदुम विभागाच्या समक्रमांक दिनांक २३ नोव्हेंबर २००१ च्या शासन निर्णयान्वये निमखा-या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टयाने देण्याबाबतचे शासकीय धोरण जाहीर करण्यात आलेले आहे. शासनाकडे उपलब्ध असलेली खाजण जमिन कोळंबी संवर्धाकरिता भाडेपट्टीने वाटप करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार लाभार्थीकडून आवश्यक तो प्रतिसाद मिळत नाही. खाजन जमिनीचे वाटप भाडेपट्टीने केल्यास शासनाच्या महसूलात वाढ होईल. तसेच, याद्वारे मत्स्यव्यवसायात खाजगी गुंतवणूक वाढेल व पर्यायाने पाण्यातील संवर्धनासाठी येईल या सर्व बाबींच्या व खाजण जमिन वाटपात येणा-या विविध अडीअडचणींचा विचार करुन वरील शासन निर्णयामधील खालील परिच्छेदामध्ये अंशतः बदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) शासन निर्णय दिनांक २३.११.२००१ मधील परिच्छेद - १. मधील सध्याच्या मजकूराऐवजी खालीलप्रमाणे सुधारित मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-

प्रत्येक गावातील उपलब्ध खाजण जमिनीपैकी २५ टक्के जमिनी इतर कामासाठी राखून उरलेल्या जमिनीपैकी ६० टक्के खाजण जमिन वैयक्तीक अर्जदार व मच्छिमारांची सहकारी संस्था व इतर संस्था यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावी. याबाबत वैयक्तीक अर्जदार व मच्छिमार सहकारी संस्था यांचा प्रतिसाद अत्यल्प आल्यास इतर प्रवर्गातील लाभधारकांचा विचार करण्यात यावा. ४० टक्के जमिन लहान उद्योजक व मोठे उद्योजक यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावी. अशा प्रकारे आरक्षण प्रत्येक खेडयाप्रमाणे निश्चित करण्यात यावे. तथापि एकूण जमिनींची उपलब्धता लक्षात घेता एखाद्या खेडयामधील संपूर्ण क्षेत्र एका वर्गासाठी संपूर्णपणे राखून ठेवण्यात हरकत नसावी. परंतु उपलब्ध क्षेत्रापैकी ६० : ४० आरक्षणाचे प्रमाणे संपूर्ण जिल्हयासाठी अंमलात आणणे इष्ट राहील.

२) शासन निर्णय दिनांक २३.११.२००१ मधील परिच्छेद २ मधील सध्याच्या मजकूराएवजी खालीलप्रमाणे सुधारित मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-

खाजण जमिन भाडेपट्टीने देण्याकरिता प्रिमियमच्या व भाडेपट्टीच्या दरात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

| अ.क्र. | लाभधारक | प्रिमियम (प्रतिहेक्टर) रुपये | वार्षिक भाडेपट्टी दर (प्रति हेक्टर ) रुपये |
|---|---|---|---|
| १ | पारंपारिक मच्छिमार व्यवसाय करणारे वैयक्तीक अर्जदार/ तसेच मत्स्यव्यवसायातील पदवीधर / पदव्युत्तर पदवी/ निमखारे पाणी कोळंबी संवर्धन प्रशिक्षण प्राप्त केलेले युवक | ५,००० | १,००० |
| २ | मच्छिमार सहकारी संस्था | १०,००० | १,५०० |
| ३ | कंपनी/पटर्न शिप फर्मस् व अन्य अर्जदार | २५,००० | २,००० |

कृषि पशुसंवर्धन, दुग्ध, व्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग
=6 MAR 2004
No.31013/4/2001-Fy(3)
Government of India
Ministry of Agriculture
Department of Animal Husbandry & Dairying

Krishi Bhawan, New Delhi.
Dated the February 20, 2004.

To

The Secretary,
Incharge of Fisheries,
Government of ...Maharashtra
...Mumbai...

**Subject:-Implementation of Centrally Sponsored Scheme on "Development of Inland Fisheries and Aquaculture" in States/UTs during 2003-2004 – Administrative Approval – reg.**

Sir,

I am directed to convey the administrative approval of Government of India for implementation of the Centrally Sponsored Scheme on "Development of Inland Fisheries and Aquaculture" under macro-management approach in States/UTs during 2003-2004 at an outlay of Rs. 16.00 crores (Rupees Sixteen Crores Only). Components approved under the scheme are: i) Development of Freshwater Aquaculture; ii) Development of Brackishwater Aquaculture; iii) Coldwater Fisheries and Aquaculture; iv) Development of Waterlogged Areas; v) Productive Utilization of Inland Saline/Alkaline Soils for Aquaculture; and vi) Integrated Development of Inland Capture Resources (reservoirs/rivers etc.).

2. The expenditure on developmental activities will be shared on 75:25 basis by the Government of India and the State/UT Governments in respect of all aforesaid components. The two components namely, Development of Freshwater Aquaculture and Brackishwater Aquaculture will be implemented by a single agency (FFDA). The remaining four components will be implemented through the Fisheries Department of the respective States/UTs. The States/UTs will be required to bear full cost on base as well as incremental staff salary, maintenance of vehicle, office contingencies and acquisition of land wherever necessary, etc. The cost towards purchase of vehicles will, however, be continued to be shared on 50:50 basis between the Government of India and the State/UT Governments.

3. The Government of India's share is in the form of grant-in-aid for all the items given in Annexures-I to VI as per the approved norms. Subsidy on these items will be given only once to a beneficiary. In addition to individual beneficiary, the financial assistance under the above components of the scheme will also be available to Self-Help Groups, Women Groups, Fisheries Cooperative Societies etc. The State/UT Governments on all these components will make a matching contribution.

4. Besides subsidy on the approved items under the scheme the balance amount for these items may be obtained as loan made available to the beneficiaries through FFDAs/States/UTs Fisheries Department from lead banks/participating banks. Subsidy for all approved items under the scheme can also be given to a beneficiary if the remaining cost of items is contributed by him from his/her own resources and is duly certified by the FFDAs/States/UTs Fisheries Department.



Scanned with CamScanner

5. Quarterly/Annual progress reports indicating physical and financial achievements shall be furnished regularly in the prescribed proforma which was earlier communicated to the State/UT Government.

6. The accounts of the agency shall be subject to audit by Chartered Accountants appointed by the agency and/or by such other officers of Government of India/State/UT Governments as required under the rules and report should be intimated to this Ministry.

7. The State/UT Governments are requested to send their proposals for the various components complete in all aspects immediately. The proposals must be accompanied by detailed progress reports of the central share released during the proceeding years and reasons for shortfalls, if any, etc. The availability of budgetary provision in the State Budget should be specifically indicated in the proposal.

8. This issues with the concurrence of Finance Division vide their Dy. No. 4373/FA/2004 dated 13.2.2004 and Secretary AHD's Dy. No. 343 dated 19.2.2004.

Yours faithfully,

20/02/2004

Encl: As above.

**(P.L. Chopra)**
**Under Secretary to the Government of India**

Copy forwarded to:-

1. The Secretary,/Planning/Finance, } All concerned.
2. The Commissioner/Director of Fisheries } State/UT Governments
3. The Pay & Accounts Officer, Department of Animal Husbandry & Dairying, 16, Akbar Road hutments, New Delhi.
4. Managing Director, National Federation of fishermen's Cooperative Ltd., 7-A, Sarita Vihar Institutional Area, New Delhi-110 044.
5. Finance II/FY (B&A)/Budget Section/Budget & Accounts Section.
6. Guard File.

20/02/2004

**(P.L. Chopra)**
**Under Secretary to the Government of India**

Scanned with CamScanner

ANNEXURE I

## Development of Freshwater Aquaculture (FFDAs) - Ongoing Component

| | Description of Items | Rate |
|---|---|---|
| 1. | Construction of new ponds | Rs.2.00 lakh/ha in the plain areas. Subsidy @ 20% with a ceiling of Rs. 40,000/ha for all farmers except SCs/STs for whom it will be Rs.50,000/ha (25%)<br><br>Rs.3.0 lakh/ha in the hill States/Districts and North-Eastern region. Subsidy @ 20% with a ceiling of Rs.60,000/ha for all farmers except SCs/STs for whom it will be Rs.75,000/ha (25%). |
| 2. | Reclamation/Renovation of ponds/tanks | Rs. 60,000/ha.<br>Subsidy @ 20% with a ceiling of Rs.12,000/ha for all farmers except SCs/STs for whom it will be Rs.15,000/ha (25%). |
| 3. | Cost of inputs | a) Finfish Culture - Rs.30,000/ha<br>Subsidy @ 20% with a ceiling of Rs.6,000/ha for all farmers except SCs/STs for whom it will be Rs.7,500/ha (25%)<br>b) Freshwater prawn culture -<br>Unit cost Rs. 1.20 lakh per ha. Subsidy @ 20% with a ceiling of Rs.24,000/- per ha |
| 4. | Running Water fish culture in hilly areas as well as in plain areas | Rs.20,000/unit of 100 sq. meters. The above cost is inclusive of Rs.4,000 towards inputs. Subsidy @ 20% with a ceiling of Rs.4,000/- unit for all farmers except SCs/STs for whom it will be Rs.5,000/unit (25%). Ceiling of 3 units for each farmer in terms of admissibility of grant. |
| 5. | Integrated Fish Farming | Rs.80,000/ha.<br>Subsidy @ 20% with a ceiling of Rs.16,000/ha for all farmers except SCs/STs for whom it will be Rs.20,000/ha (25%). |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 6. | Aerators/Pumps | Rs.50,000/unit of two 1hp aerators/one 5hp diesel pump. Subsidy @ 25% with a ceiling of Rs.12,500 for each set of aerators/pump for all categories of farmers who have reached a level of production of 3000 kg/ha/year. Maximum of two 1hp aerators/one 5hp diesel pump for one hectare water area will be admissible. |
| 7. | Freshwater Fish Seed Hatchery | Rs.8 lakh for a fish seed hatchery with a million (fry) capacity for the plain area and Rs.12 lakh for same capacity in the hill States/Districts and NE Region. Subsidy @ 10% with a ceiling of Rs.80,000/ in the hilly areas to entrepreneurs only. |
| 8. | Fish Feed Units | Small Units - Unit cost is Rs.5 lakh with a capacity of 1.2 quintals /day. The subsidy would be @ 20% with a ceiling of Rs. 1 lakh per unit to entrepreneurs. |
| 9. | Training of fish farmers | Stipend @ Rs.100/- per day during training period of 10 days and a lump sum of Rs.100/- towards travel expenses/field visits. |
| 10. | Establishment of fish seed hatchery | (i)Unit cost is Rs.30 lakhs for a large freshwater prawn hatchery with a minimum capacity of 25 million PL/year. This would be one time grant to the States for establishment of hatchery at State level.<br><br>(ii)Unit cost is Rs.8 lakhs for a small hatchery of 5-10 million PL/Year capacity. Subsidy @ 20% with a ceiling of Rs.1.60 lakhs to entrepreneurs as one time grant. |
| 11. | Establishment of laboratories at State level for water quality and fish health investigations | Unit cost is Rs.30 lakhs (Rs.25 lakh for the construction of building and Rs.5 lakh for equipment, glassware & chemicals, etc.). This would be one time grant to the States. Operational and other recurring cost would be met by the respective States. |
| 12. | Provision of soil and water testing kits to each FFDA | Unit cost of each soil and water testing kit is Rs.30,000. The kits are sanctioned once to each FFDA as one time grant. |
| 13. | Setting up of integrated units, including hatcheries for ornamental fishes | Unit cost is Rs.15 lakhs which includes hatchery of 5-10 million (fry) capacity. Subsidy @ 10% with a maximum ceiling of Rs.1.50 lakh to all categories of fish farmers. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | Transportation of fish/prawn seed | This will be applicable only for the hill States/Districts and North-Eastern Region. Subsidy @ Rs.20 for 1000 fry transported to all FFDAs. Not applicable to individual fish farmer. |
| 15. | Purchase of Vehicles | 50% cost of vehicle for each new FFDA and 50% cost for the replaced vehicle (second vehicle). |

- Expenditure on all items above except purchase of vehicles (item 15) will be shared on 75:25 basis between Government of India and States.

- The above assistance under FFDA programme is available only once to a beneficiary.

- Subsidy for the construction of new ponds and tanks, reclamation/renovation of ponds/tanks and first year inputs to an individual beneficiary up to 5 ha is available with or without institutional finance in the plain areas and 1.0 ha in the hill States/Districts on pro-rata basis.

Scanned with CamScanner

ANNEX

## Development of Brackishwater Aquaculture (BFDAs) - Ongoing Component

| | Description of Items | Rate |
|---|---|---|
| 1. | Renovation or construction of brackishwater fish farms | Beneficiaries will be small shrimp farmers ha[ving] land holding of 2 ha or less. 25% cost subject to a maximum of Rs. 40,000/- p[er] ha as subsidy. |
| 2. | For training of shrimp farmers | Training part could be managed by the S[tate] Governments by availing assistance under ano[ther] scheme on Fisheries Training and Extension could provide specific/specialized training thro[ugh] the centers of expertise on surveillance cen[ters] proposed under the programme at Sl.No.5 below |
| 3. | Establishment of Demonstration-cum-Training center | One time GOI's share of grants amounting to Rs 5.00 lakh. |
| | NEW ACTIVITIES | |
| 4. | Aquatic Quarantine and Inspection Unit (AQIU) | Unit Headquarter at Delhi and supporting sta[ff] NBFGR (ICAR Institute) and nodal units one [each] on east and west coast. 100% expenditure wil[l be] incurred by the Centre. |
| 5. | Network of Diagnostic Laboratories for Aquatic Animal Health | 100% expenditure will be incurred by the Centr[e] |

Expenditure on items from 1 to 3 above will be shared on 75:25 basis between GOI and States. On items 4 and 5 above, 100% expenditure will be borne by the GOI.

Scanned with CamScanner

**ANNEXURE-III**

## Coldwater Fisheries and Aquaculture (New Component)

| | Description of Items | Rate |
|---|---|---|
| 1. | Preparation of resource survey report/feasibility report | Rs. 5 lakh as one time grant to the State Government |
| 2. | Short term investigations, breeding or rearing etc. | Rs. 5 lakh as one time grant to the State Government |
| 3. | Construction, renovation, extension or remodeling of fish farms | One time grant. Amount to be decided on the merit of the proposal |
| 4. | Farming units for coldwater fish species and first year inputs | Unit cost of Rs. 35,000/- (Rs. 25,000/- plus Rs.10,000/-) for a unit size - 15m x 2m x 1m. Subsidy to beneficiaries @ 20% with a maximum ceiling of Rs. 7,000/- per unit. |
| 5. | Units for running water fish culture | Unit cost including inputs Rs. 42,500/-. Subsidy to beneficiaries @ 20% with a ceiling of Rs. 8,500/- per unit. |
| 6. | Feed units | Rs. 10 lakhs per unit as one time grant to State Governments |
| 7. | Training of fish farmers | Stipend @ Rs.100/- per day of training (for a period of 10 days) and a lump sum payment of Rs.100/- towards travel expenses/field visits per trainee. |
| 8. | Purchase of vehicle | Purchase of one vehicle under the scheme is allowed. Expenditure to be shared on 50:50 basis by the Centre and the states. |

Expenditure on all the above items except sl. No. 8 (purchase of vehicle) to be shared on 75:25 basis by the Centre and States.

Scanned with CamScanner

ANNEXURE-IV

## Development of Waterlogged Areas - (New Component)

| | Description of Items | Rate |
|---|---|---|
| 1. | Development of Waterlogged areas | Unit cost Rs. 1.25 lakh/ha Subsidy @ 20% to the beneficiary with ceiling of Rs. 25,000/- per ha. |
| 2. | Inputs (fish/prawn) seed, feed, manure, fertilizers, preventing measures for disease, transportation charges, etc.) | Unit cost Rs. 75,000/- per ha Subsidy @ 20% to the beneficiary with ceiling of Rs. 15,000/- per ha. |
| 3. | Training | Stipend @ Rs.100/- per day durin training (maximum period of 10 days and a lump sum payment of Rs.100/ towards travel expenses/field visits pe trainee. |

Expenditure on all the above items will be shared on 75:25 basis by the Centre and States.

20/02/2014

Scanned with CamScanner

ANNEXURE-V

## Productive Utilization of Inland Saline/Alkaline Waters for Aquaculture (New Component)

| | Description of Items | Rate |
|---|---|---|
| 1. | Cost for construction | Unit cost Rs. 2.5 lakh/ha<br>Subsidy @ 20% with ceiling of Rs.50,000/- per ha |
| 2. | Input cost | Unit cost Rs. 1 lakh/ha<br>Subsidy @ 20% with a ceiling of Rs. 20,000/- per ha |
| 3. | Training | Stipend @ Rs.100/- per day during training (maximum period of 10 days) and a lump sum payment of Rs.100/- towards travel expenses/field visits per trainee. |

Expenditure on all the above items will be shared on 75:25 basis by the Centre and States.

20/02/2004

Scanned with CamScanner

ANNEXURE-VI

## Inland Capture Fisheries (Reservoirs/Rivers etc.) - New Component

| | Description of Items | Rate |
|---|---|---|
| 1. | Fish seed rearing units | |
| | Seed Rearing Units | Unit cost Rs. 2 lakh/ha<br>Subsidy @ 20% to the beneficiary/State Government/FISHCOPFED etc. with a ceiling of Rs. 40,000/- per ha |
| | Cages/pens with inputs | Unit cost Rs. 15,000/-<br>Subsidy @ 20% to the beneficiary/State Government/FISHCOPFED etc. with a ceiling of Rs. 3000/- per unit |
| 2. | Input cost (seed, feed, manures, fertilizers, preventive measures for disease etc.) | Unit cost Rs. 30,000/- per ha (one time)<br>Subsidy @ 20% to the beneficiaries/State Government/FISHCOPFED with a ceiling of Rs. 6000/- per ha |
| 3. | Training | Stipend @ Rs.100/- per day during training (maximum period of 10 days) and a lump sum payment of Rs.100/- towards travel expenses/field visits per training. |
| 4. | Craft and gear (nets, boats etc.) | Unit cost Rs. 15,000/-<br>Subsidy @ 20% with a ceiling of Rs. 3000/- per unit |
| 5. | Construction of landing centers | Unit cost Rs. 1,00,000/- per landing center<br>Assistance to State Government |
| 6. | Riverine Fisheries<br>Conservation and Awareness Programmes | Financial assistance to State Government for conservation/river ranching etc. with a maximum ceiling of Rs.2 lakhs in a year. |

Expenditure on all the above items will be shared on 75:25 basis by the Centre and States.

Scanned with CamScanner

निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबत शासकीय धोरण

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक निखायो १४९२/ प्र.क्र.१६३/ पदुम-१२
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२,
दिनांक :- २३ नोव्हेंबर,२००१

वाचा:- १)शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्रमांक एफडीएक्स -१४८४/ सीआर १८०/पदुम-१२, दि.२४ जून,१९८५
२) शासन पत्र महसूल व वन विभाग पत्र क्रमांक संकीर्ण १०९२/प्र.क्र.९३/ज-१ ,दि.१९ जून,९२.
३) शासन ज्ञापन महसूल व वन विभाग क्र.जमीन २७९१/प्र.क्र.१५६/ज-४,दि.१४/१२/१९९४.

प्रस्तावना :-

भारतातील बऱ्याच राज्यात निमखारे पाणी, मत्स्यसंवर्धन पारंपारिक पध्दतीने प्रचलित आहे. अलिकडे कोळंबीला परदेशातून येणाऱ्या वाढत्या मागणीमुळे व समुद्रातून मिळणाऱ्या उत्पादनामुळे निमखारे पाणी मत्स्यसंवर्धनातून कोळंबी उत्पादन वाढविणे ही काळाची गरज बनली आहे. तथापि राज्यात उपलब्ध असलेल्या खाजण जमिनीचा योग्य प्रकारे मत्स्य शेतीसाठी उपयोग होऊ शकलेला नाही. कारण यासंबंधीचे आवश्यक ज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, देशात उपलब्ध असलेल्या खाजण जमिनी या उपक्रमाखाली आणण्याचे धोरण शासनाने यापूर्वीच निश्चित केलेले आहे. त्यानुसार खाजणजमिनीचे वाटप व प्रिमियम व भाडे पट्टीचे दर यापूर्वी ठरविण्यात आले होते. परंतु, बदलत्या काळानुसार त्यामध्ये करावयाच्या बदलाबाबत विचार करुन खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबतचे सुधारीत धोरण ठरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- सदर प्रस्तावावर शासनाने सर्वतोपरी विचार करुन निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने देण्याबाबतचे शासकीय धोरण खालीलप्रमाणे ठरविण्याचा निर्णय घेतला आहे :-

१) प्रत्येक गावातील उपलब्ध खाजण जमिनीपैकी २५% जमिन इतर कामासाठी राखून ठेवल्यानंतर उरलेल्या जमिनीपैकी ६०% खाजण जमिन वैयक्तिक अर्जदार व मच्छिमारांची सहकारी संस्था व इतर सस्था यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावी व ४०% खाजण जमिन लहान उद्योजक व मोठे उद्योजक यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावी. अशा प्रकारे आरक्षण प्रत्येक खेडयाप्रमाणे निश्चित करण्यात यावे. तथापि एकूण जमीनीची उपलब्धता लक्षात घेता, एखाद्या खेडयामधील संपूर्ण क्षेत्र एका वर्गासाठी संपूर्णपणे राखून ठेवण्यास हरकत नसावी. परंतु उपलब्ध क्षेत्रापैकी ६०:४० आरक्षणाचे प्रमाण

संपूर्ण जिल्ह्यासाठी [illegible]

२) खाजण जमिन भाडेपट्टीने देण्याकरिता प्रिमियममध्ये व भाडेपट्टीच्या दरात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे:-

| अ.क्र. | लाभधारक | प्रिमियम (प्रती हेक्टर) (रुपये) | वार्षिक भाडेपट्टी दर (प्रती हेक्टर) (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | परंपरागत मच्छिमार व्यवसाय करणारे वैयक्तिक अर्जदार | ५,००० | १,००० |
| २ | मच्छिमार सहकारी संस्था | १०,००० | १,५०० |
| ३ | कंपनी / पार्टनरशिप फर्म्स व अन्य अर्जदार | २५,००० | २,००० |

भाडेपट्टीच्या दरामध्ये दर पांच वर्षांनी वर विहित करण्यात आलेल्या रक्कमेइतकी वाढ करण्यात यावी

३. खाजण जमिन वाटपासाठी वैयक्तिक लाभार्थीच्या निवडीबाबत प्राधम्यक्रम खालीलप्रमाणे राहिल :-

| लाभार्थीच्या निवडीसाठी प्राधम्य क्रमवारी | प्रवर्गामधील प्राधम्यक्रमवारी |
|---|---|
| १) ज्या भागात जमिनीचे वाटप करावयाचे आहे त्यांच गावातील अर्जदार. | १) मच्छिमार समाजातील अर्जदार<br>२) अनुसचित जाती/ जमाती / विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील अर्जदार |
| २) ज्या जिल्हयातील जमिनीचे वाटप करावयाचे आहे त्याच जिल्हयातील अर्जदार | ३) इतर मागासवर्गीय जातीमधील अर्जदार<br>४) माजी सैनिक<br>५) सुशिक्षित बेरोजगार अर्जदार<br>६) इतर अर्जदार |

४) वैयक्तिक अर्जदारासाठी उपलब्ध खाजण जमिनीपैकी ४/५ जमीन स्थानिक लोकांसाठी म्हणजे सदर क्षेत्र उपलब्ध असलेल्या जिल्हयातील लोकांसाठी राखून ठेवण्यात यावे व १/५ क्षेत्र इतर जिल्हयातील अर्जदारांना वाटपाकरिता उपलब्ध करण्यात यावी.

५) सुधारीत निर्णयानुसार वैयक्तिक अर्जदारांना कमाल ५ हेक्टरपर्यंत खाजण जमिनीचे वाटप करण्यात येईल व सहकारी संस्था तसेच इतर संस्था, कंपनी व उद्योजक यांना कमाल वाटप ३० हेक्टरपर्यंत करण्यात येईल. एकत्रित प्रकल्पाकरिता अतिरिक्त ५ हेक्टरपर्यंत जमिन वाटप करण्यांत येईल.

Scanned with CamScanner

६) मत्स्य शेतीसाठी खाजण जमिन मिळणेबाबतच्या अर्जाच्या पडताळणीसाठी पुढील कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी :-

१. अर्जदाराने आवश्यक अर्ज जिल्ह्याच्या निमखारे पाणी मत्स्य संवर्धन विकास यंत्रणेकडे सादर करावा. अर्जासोबत प्रकल्प अहवाल, त्याचे तांत्रिक /आर्थिक वर्धन क्षमता इत्यादीचा सविस्तर तपशील अर्जदाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. निमखारे पाणी मत्स्य संवर्धन विकास यंत्रणेने अर्जाची तपासणी करुन प्रकल्पाची वर्धन क्षमता तसेच अर्जदाराची आर्थिक क्षमता अजमावून सक्षम प्राधिका-याकडे तो अर्ज पाठवावा.

२. निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेकडे अर्ज प्राप्त झाल्यावर इतर तांत्रिक/प्रशासकीय बाबींसह पुढील बाबींची तपासणी करावी.:-

(अ) अर्जदाराने मागणी केलेली जमिन कोळंबी संवर्धनासाठी उपयुक्त आहे किंवा कसे

(ब) अर्जदाराने मागणी केलेली जमिन वाटपासाठी उपलब्ध आहे किंवा कसे

(क) अर्जदाराची कोळंबी संवर्धनाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे का व तसेच त्याबद्दलची तांत्रिक माहिती ही आहे किंवा कसे

(ड) अर्जदारास राज्यामध्ये दुस-या अन्य ठिकाणी कोळंबी संवर्धनासाठी शासकीय खाजण जमिनीचे वाटप करण्यात आले आहे किंवा कसे

(इ) प्रकल्प अहवालाची व अर्जदाराची तांत्रिक / आर्थिक क्षमतेची विस्तृत तपासणी करावी. अर्जदारास निमखारे पाणी मत्स्य संवर्धन विकास यंत्रणेकडून सवलती मिळणार असल्यामुळे सदर यंत्रणेच्या तांत्रिक अधिकारी -वर्गाकडून प्रकल्पाच्या सक्षमतेची तपासणी करण्यात यावी.

७) खाजण जमिन मत्स्य शेतीसाठी भाडेपट्ट्याने देण्याबाबत सर्व साधारण अटी व शर्ती परिशिष्ट- अ मध्ये दिलेल्या आहेत. त्यातील अटींचे पालन न केल्यास किंवा कोणत्याही अटीचा भंग केल्याचे आढळल्यास कारणे दाखवा नोटिस किंवा पुर्व सूचना देऊन भाडेपट्ट्याचा करार रद्द करण्याचा अधिकार जमिन वाटप करणा-या सक्षम प्राधिका-यास राहील.

८) खाजण जमिनीचे क्षेत्रनिहाय वाटपास मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त/ शासन असे त्रिस्तरावर ठेवण्यात आले आहेत. जमिन वाटपाबाबत २० हेक्टरपर्यंतचे अधिकार जिल्हाधिकारी यांना, ५० हेक्टरपर्यंतचे अधिकार विभागीय आयुक्त यांना व ५० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रासाठी जमिन वाटपाचे अधिकार शासनाकडे राहील. जिल्हाधिकारी व आयुक्त यांना प्रदान करावयाच्या अधिकाराबाबतचे आवश्यक आदेश महसूल व वन विभागामार्फत निर्गमित करण्यात येतील.

Scanned with CamScanner

२. हे आदेश महसूल व वन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्र.१८९४६/व्यय -१ दिनांक २८/८/२००१ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

सहपत्र : परिशिष्ट-अ

(श्या. ना. धकाते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव
आयुक्त ,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
विभागीय आयुक्त, मुंबई
आयुक्त,मुंबई महानगर पालिका, मुंबई
जिल्हाधिकारी, मुंबई / मुंबई उपनगर / ठाणे/ रायगड / रत्नागिरी/ सिंधुदुर्ग
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक कोकण विभाग, मुंबई
सहायक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई / ठाणे- पालघर/ रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघ , मुंबई
व्यवस्थापकीय संचालक ठाणे जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ, ठाणे
व्यवस्थापकीय संचालक रायगड जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ, अलिबाग
व्यवस्थापकीय संचालक रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ, रत्नागिरी
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई
प्रधान सचिव, महसूल ,मंत्रालय
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय
सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
सर्व कक्ष अधिकारी, (पदुम कक्ष) कृषि व पदुम विभाग,मंत्रालय
निवड नस्ती.

Scanned with CamScanner

शासन निर्णय क्रमांक नियायो १४१२/ प्र.क्र.१६३/ पदुम-१२, दिनांक२३नोव्हेंबर,२००१ चे सहपत्र
परिशिष्ट अ

## खाजण जमिन मत्स्य शेतीसाठी भाडेपट्टीने देण्यासाठीच्या साधारण अटी व शर्ती

१. मोठ्या उद्योजकांना जमिन देतांना त्यांनी स्थानिक, विशेषतः मच्छिमार समाजांतील व दुर्बल गटातील लोकांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देऊन त्यांना उद्योग धंद्यात / नोकरीत सामावून घेण्याची अट राहील.

२. मोठ्या उद्योजकांना शक्य तों मत्स्य बीज नैसर्गिक स्थानातून गोळा करण्यांस परवानगी देण्यात येऊ नये.

३. भाडेपट्टीचा एकूण कालावधी ३० वर्षाचा असेल.

४. तीन महिन्याची नोटीस देऊन भाडेपट्टीचा करार रद्द करावा व त्यातून मुक्त होण्याचे स्वातंत्र्य शासनास व पट्टाधारकांस राहील. ज्या कामाकरिता जमिन दिली आहे त्या कामाकरितापट्टेधारकांनी प्रामाणिकपणे व ठळकपणे दिसतील असे प्रयत्न केले नाहीत वा करीत नाहीत असे दिसून आले तर तीन महिन्याची नोटीस देऊन जमिनीचा ताबा परत घेण्याचे अधिकार शासनास राहील.

५. जमिनीचे वाटप होऊन जमिन भाडेपट्टीने ताब्यात मिळाल्यावर दोन वर्षाच्या कालावधीत जर दिलेल्या क्षेत्राच्या १/३ भागात व ५ वर्षाच्या कालावधीत संपूर्ण जमिनीचा विकास संबधित पट्टाधारकांने केला नाही तर दिलेली जमिन परत ताब्यात घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

६. जमिन मंजूर करतांना महसूल व वन विभागांने विहित केलेल्या इतर सर्व साधारण अटी बंधनकारक राहतील.

७. जमिनीचे प्रिमियमचे व भाडेपट्टीचे दर या शासन निर्णयाच्या परिच्छेद २ प्रमाणे राहतील.

८. भुईभाडयाच्या दरामध्ये दर पाच वर्षांनी सुधारणा करण्यात येईल.

९. भाडेपट्टाधारकाला जमिन किंवा त्याचा काही भाग शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय पोट भाडयाने देता येणार नाही / तारण ठेवता येणार नाही किंवा सदर जमिनीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही.

१०. जिल्हाधिका-याच्या पूर्व परवानगीशिवाय भाडेपट्टाधारकाने जमिनीवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम उदा: शेडस्, चौकीदाराचे वास्तव्यगृह इत्यादी बांधू नये. तसेच त्यासाठी महाराष्ट्र जमिन महसून संहिता व त्याखालील नियमामधील तरतूदीनुसार आवश्यक तो बिगर शेती परवाना भाडेपट्टाधारकाने जिल्हाधिका-यांकडून मिळविला पाहीजे.

११. प्रिमियमच्या रक्कमेत तसेच वार्षिक भुईभाडयाच्या दरात शासनाने सुधारणा केल्यास सुधारीत दराने प्रिमियम व भुईभाडे देण्याचे बंधन पट्टेधारकावर राहिल.

Scanned with CamScanner

शासकीय खाजण जमिन ज्यांना भाडेपट्टीने दिली जाईल त्यांना मत्स्योद्योगासाठी वित्तीय कडून कर्ज घेण्यासाठी त्यांच्या विनंतीनुसार सदरची जमिन तारण ठेवण्यास परवानगी देता येईल मात्र, वानगी, अशा जमिनीची केवळ भाडेपट्टीचे हक्क तारण ठेवण्यापुरते मर्यादित राहील- त्याकरिता ल अटी व शर्ती च्या अधिन राहून मान्यता देण्यात यावी-

अ) पट्टेदारानी त्यांची स्वतःची मालमत्ता प्रथमतः वित्तीय संस्थेकडे तारण ठेवणे आवश्यक राहील व त्यांनी भाडेपट्टीने धारण केलेल्या शासकीय खाजण जमिनी या केवळ अनुषंगिक प्रतिभूती (कोलॅटरल सिक्युरिटी) म्हणून राहतील-

ब)(१) पट्टेदारांची मालमत्ता जप्त करण्याचा प्रसंग उद्‌भवल्यास धनको वित्तीय संस्था भाडेपट्ट्याच्या मुळ अटी व शर्तीवर भाडेपट्टीच्या उर्वरीत कालाकरिता शासनाचे पट्टेदार या नात्याने शासकीय जमिन ताब्यात घेऊ शकेल-

(२) ज्या प्रयोजनासाठी या जमिनी मुळ पट्टेदारास दिल्या आहेत त्याच प्रयोजनासाठी त्याचा पुढे वापर करणे आवश्यक राहील-

क) पट्टेदाराच्या कर्ज फेडीच्या कसुरीबद्दल वित्तीय संस्थेने शासकीय जमीन ताब्यात घेतल्यास ती जमीन दुस-या व्यक्तीला /संस्थेला /उद्योजकाला भाडेपट्टीच्या उर्वरीत कालावधीसाठी शासनाच्या परवानगीने भाडेपट्टीने दिल्यास पोट भाडेपट्ट्याव्दारे होणाऱ्या अनर्जित उत्पन्नातील ५०% हिस्सा शासनास द्यावा लागेल-

१३- उपरोक्त अटीचे पालन न केल्यास किंवा कोणत्याही अटीचा भंग केल्याचे आढळल्यास कारणे दाखवा नोटिस किंवा पुर्व सुचना देऊन भाडेपट्ट्याचा करार रद्द करण्याचा अधिकार जमिन वाटप करणा-या सक्षम प्राधिका-यास राहील-

Scanned with CamScanner

निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्यासाठी अधिकार प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : जमीन १०/२००२ / प्र.क्र. ११०/ ज-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ११ मार्च, २००२.

सुपस (निपास)

**वाचा:** शासन निर्णय कृषि व पदुम विभाग, क्रमांक निखायो १४९२ / प्र.क्र.१६३ / पदुम - १२, दिनांक २३ नोव्हेंबर, २००१

शासन निर्णयः-

शासन निर्णय,कृषि व पदुम क्रमांक निखायो १४९२ / प्र.क्र.१६३ / पदुम - १२, दिनांक २३ नोव्हेंबर, २००१ अन्वये निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार खाजण जमीन वाटपास मंजुरी देण्याचे अधिकार खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत : -

| अ.क्र. | सक्षम प्राधिकारी | वाटप मंजुरी कमाल क्षेत्र |
|---|---|---|
| १ | संबंधीत जिल्हाधिकारी | २० हेक्टर पर्यंत |
| २ | विभागीय आयुक्त | ५० हेक्टर पर्यंत |
| ३ | शासन | ५० हेक्टर पेक्षा जास्त |

२. वरील प्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे विल्हेवाट ) नियम, १९७१ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

आयुक्त, मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
१९ मार्च २००२ MAR 2002
१२६

(रा.रा.नागरे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग,

प्रति,
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा.मंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव

C:\WINDOWS\...

निमखा-या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबत शासकीय धोरण- सुधारणा

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
पूरक पत्र क्रमांक निखायो १४९२/प्र.क्र. १६३/पदुम १२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ मार्च, २००३

पहा : शासन निर्णय ,कृषि व पदुम विभाग क्र. निखायो १४९२/प्र.क्र. १६३/पदुम १२, दि. २३ नोव्हेंबर, २००१

**पूरक पत्रक :-** कृषि व पदुम विभागाच्या समक्रमांक दिनांक २३ नोव्हेंबर २००१ च्या शासन निर्णयान्वये निमखा-या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टयाने देण्याबाबतचे शासकीय धोरण जाहीर करण्यात आलेले आहे. शासनाकडे उपलब्ध असलेली खाजण जमिन कोळंबी संवर्धाकरिता भाडेपट्टीने वाटप करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार लाभार्थीकडून आवश्यक तो प्रतिसाद मिळत नाही. खाजण जमिनीचे वाटप भाडेपट्टीने केल्यास शासनाच्या महसूलात वाढ होईल. तसेच, याद्वारे मत्स्यव्यवसायसात खाजगी गुंतवणूक वाढेल व पर्यायाने पाण्यातील संवर्धनासाठी येईल या सर्व बाबीच्या व खाजण जमिन वाटपात येणा-या विविध अडीअडचणींचा विचार करुन वरील शासन निर्णयामधील खालील परिच्छेदामध्ये अंशतः बदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) शासन निर्णय दिनांक २३.११.२००१ मधील परिच्छेद - १. मधील सध्याच्या मजकूराऐवजी खालीलप्रमाणे सुधारित मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-

प्रत्येक गावातील उपलब्ध खाजण जमिनीपैकी २५ टक्के जमिनी इतर कामासाठी राखून उरलेल्या जमिनीपैकी ६० टक्के खाजण जमिन वैयक्तीक अर्जदार व मच्छिमारांची सहकारी संस्था व इतर संस्था यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावी. याबाबत वैयक्तीक अर्जदार व मच्छिमार सहकारी संस्था यांचा प्रतिसाद अत्यल्प आल्यास इतर प्रवर्गातील लाभधारकांचा विचार करण्यात यावा. ४० टक्के जमिन लहान उद्योजक व मोठे उद्योजक यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावी. अशा प्रकारे आरक्षण प्रत्येक खेडयाप्रमाणे निश्चित करण्यात यावे. तथापि एकूण जमिनीची उपलब्धता लक्षात घेता एखाद्या खेडयामधील संपूर्ण क्षेत्र एका वर्गासाठी संपूर्णपणे राखून ठेवण्यात हरकत नसावी. परंतु उपलब्ध क्षेत्रापैकी ६० : ४० आरक्षणाचे प्रमाणे संपूर्ण जिल्हयासाठी अंमलात आणणे इष्ट राहील.

२) शासन निर्णय दिनांक २३.११.२००१ मधील परिच्छेद २ मधील सध्याच्या मजकूराऐवजी खालीलप्रमाणे सुधारित मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-

खाजण जमिन भाडेपट्टीने देण्याकरिता प्रिमियमच्या व भाडेपट्टीच्या दरात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली.

| अ.क्र. | लाभधारक | प्रिमियम (प्रतिहेक्टर) रुपये | वार्षिक भाडेपट्टी दर(प्रति हेक्टर ) रुपये |
|---|---|---|---|
| १ | पारंपारिक मच्छिमार व्यवसाय करणारे वैयक्तीक अर्जदार/ तसेच मत्स्यव्यवसायातील पदवीधर / पदव्युत्तर पदवी/ निमखारे पाणी कोळंबी संवर्धन प्रशिक्षण प्राप्त केलेले युवक | ५,००० | १,००० |
| २ | मच्छिमार सहकारी संस्था | १०,००० | १,५०० |
| ३ | कंपनी/पॅटर्न शिप फर्मस् व अन्य अर्जदार | २५,००० | २,००० |

Scanned with CamScanner

" निमखा-या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी
शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबत
शासकीय धोरण - सुधारणा.

महाराष्ट्र शासन,
कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- निखायो-२००४/प्र.क्र.३९/पदुम १२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांक : १३ ऑगस्ट, २००४.

वाचा :- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.निखायो-१४९२/प्र.क्र.१६३/पदुम-१२, दि. २३.११.२००१.
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक निखायो-१४९२/प्र.क्र.१६३/पदुम १२, दि.१५.३.२००३.
३) ) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक निखायो-१४९२/प्र.क्र.१६३/पदुम १२, दि.२०.१०.२००३.

शासन निर्णय :-

कृषि व पदुम विभागाच्या निखायो-१४९२/प्र.क्र.१६३/पदुम-१२, दिनांक २३ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णयामध्ये निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबतचे धोरण जाहीर करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयामध्ये परिच्छेद-२ मधील अनु.१ च्या वर्गवारीमध्ये लाभधारक हे **'पारंपारिक मच्छिमार व्यवसाय करणारे वैयक्तिक अर्जदार तसेच मत्स्यव्यवसायातील पदवीधर/पदव्युत्तर पदवी धारक करणारे व निमखारे पाणी कोळंबी संवर्धन प्रशिक्षण प्राप्त केलेले युवक'** असावेत असा समक्रमांक दिनाक १५.३.२००३ च्या पुरकपत्रकान्वये निश्चित करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयात **'कोकण रेल्वे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त तसेच इतर प्रकल्पग्रस्त'** या प्रवर्गाचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत आता शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

१) मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याकरिता शासन निर्णय दिनांक २३ नोव्हेंबर, २००१ परि-२ मधील अनुक्रमांक १ च्या प्रवर्गामध्ये दिनांक १५ मार्च, २००३ च्या पुरकपत्रान्वये समावेश केलेल्या लाभधारकाच्या यादीमध्ये **"निमखारे पाणी कोळंबी संवर्धन प्रशिक्षण प्राप्त केलेले युवक"** या पुढे **"कोकण रेल्वे प्रकल्पामधील प्रकल्पग्रस्त व इतर प्रकल्पग्रस्त"** या प्रवर्गाचा समावेश करण्यात यावा व त्यानुसार संबंधित लाभार्थींना प्रिमियम व वार्षिक भाडेपट्टीची आकारणी करण्यात यावी. संदर्भाधिन दिनांक २३ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णयामधील अन्य तरतुदीमध्ये कोणताही बदल नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(गो. भ. शिंदे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री ( मत्स्य) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री/राज्यमंत्री (सर्व)
मा.मुख्यसचिव

Scanned with CamScanner

आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विभागीय आयुक्त, मुंबई
आयुक्त मुंबई महानगरपालिका,मुंबई.
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर /ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, कोकण विभाग, मुंबई
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई/ठाणे,पालघर/रायगड, रत्नागिरी,सिंधुदूर्ग
महालेखापाल,महाराष्ट्र-१, मुंबई
प्रधान सचिव, महसूल विभाग,मंत्रालय
प्रधान सचिव, नियोजन विभाग,मंत्रालय
प्रधान सचिव, वित्त विभाग,मंत्रालय
प्रधान सचिव, पर्यावरण विभाग,मंत्रालय
प्रधान सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबइ
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघ, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, ठाणे जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, रायगड जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ,मुंबई
सर्व कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवडनस्ती, पदुम-१२.

Scanned with CamScanner

"निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी उत्पादनासाठी शासकीय खाजण जमिनीचे नियत वाटप."

महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
निर्णय क्रमांक मत्स्यवि-१४८४/प्र. क्र. ३/पदुम-१२,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २९ ऑगस्ट, १९९०.

वाचा:- शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि-१४८४/[न. क्र. १८०]/पदुम-१२,
दिनांक २४ जून, १९८५.

निर्णय:-

निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी उत्पादनासाठी निरनिराळ्या लाभधारकांना शासकीय खाजण जमिनीच्या वाटपासंबंधीचे आदेश शासन निर्णय कृषि व सहकार विभाग क्रमांक मत्स्यवि-१४८४/[न. क्र. १८०]/पदुम-१२, दिनांक २४-६-१९८५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशान्वये मत्स्यव्यवसाय समाजातील आणि दुर्बल घटकातील व्यक्तींना ५ हेक्टरपर्यन्त, मत्स्यव्यवसायिकांच्या सहकारी संस्थांना २५ हेक्टरपर्यन्त, छोट्या उद्योजकांना ५ हेक्टरपर्यन्त आणि मोठ्या उद्योजकांना ५० (१००) हेक्टरपर्यन्त शासकीय जमिनीचे वाटप करण्याचे ठरविण्यात आले होते. राज्यातील निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी उत्पादनाचा कार्यक्रम हाती घेण्यासाठी आता खाजगी उद्योजक तसेच खाजगी कंपन्या मोठ्या संख्येने पुढे येत असल्याने या लाभधारकांना राज्यात सध्या उपलब्ध असलेली जमीन मोठ्या प्रमाणात भाडेपट्टीने देण्याचे शासनाने ठरविले आहे. या संदर्भात मत्स्यव्यवसायिकांच्या सहकारी संस्थांना तसेच खाजगी कंपन्यांना प्रत्येकी १०० हेक्टरपर्यन्त शासकीय जमिन देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. आता शासनाचे असे आदेश आहेत की, वर नमूद केलेल्या शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-१४८४/न. क्र. १८०/पदुम-१२, दिनांक २४-६-८५ मध्ये खाली दर्शविलेल्या सुधारणा करण्यात याव्यात:-

१] परिच्छेद १ [२] मध्ये २५ हेक्टरऐवजी १०० हेक्टर असे वाचावे.
२] परिच्छेद १ [४] मध्ये ५० हेक्टरऐवजी १०० हेक्टर असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[स्वाक्षरी]
[अ. ग. ...]
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

प्रति,-
मत्स्यव्यवसाय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००२.

कृ. मा. प.

Scanned with CamScanner

आयुक्त, मुंबई विभाग, मुंबई,
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई [पत्राद्वारे]
जिल्हाधिकारी, मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग,
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई,
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई, ठाणे[पालघर] अलिबाग [रायगड],
रत्नागिरी, सिंधुदुर्ग [मालवण]
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मच्छिमारी सहकारी संघ लि, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, ठाणे जिल्हा मच्छिमारी सहकारी संघ लि. ठाणे,
व्यवस्थापकीय संचालक, रायगड जिल्हा मध्यवर्ती मच्छिमारी सहकारी संघ, अलिबाग,
व्यवस्थापकीय संचालक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती मच्छिमारी सहकारी संघ,
रत्नागिरी.
सामान्य प्रशासन विभाग,
महसूल व वन विभाग,
वित्त विभाग/ पाटबंधारे विभाग,
ग्राम विकास विभाग,
महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई,
सचिव, भारत सरकार, कृषि मंत्रालय, [कृषि व सहकार विभाग] नवी दिल्ली
[पत्राद्वारे]
मा. मंत्री [पदुम] यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री [म. व्य] यांचे खाजगी सचिव.

Scanned with CamScanner

Allotment of Government Marshy lands for brackish Water fish farming.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Agriculture and Cooperation Department,
Resolution No.FDX-1484/(CR-180)/ADF-12,
Mantralaya Annexe, Bombay-32.

24th June, 1985.

READ: 1) Government of India, Ministry of Agriculture, Department of Agriculture and Cooperation's letter NO.31035/47/80-FY(T-1), dated the 4th September, 1982.

PREAMBLE Brackish water fish culture is practised in India mainly by traditional methods. With the demand for prawn for export market and the limitation of prawn stocking from the open sea, proper utilisation of brackish water areas is now the need of the hour. Brackish water areas have, however, remained untapped, so far, mainly for want of development of scientific methods, adoption of modern technology, availability of scientific technical advice. The Research Institutes in India have no doubt, done some research in this field and have achieved an element of success in developing scientific techniques for breeding of the commercial varieties of prawn under controlled condition. This has opened a new vista in the direction of development of brackish water fish farming. Considering the importance of the development of brackish water area for fish farming, the Government of India have encouraged the State Governments to take up the programme. The main thrust of the programme is to develop fish farming in brackish water areas in a manner that would benefit the rural population, with particular emphasis on uplifting the weaker sections of the society.

2. There are over 50,000 hectares of brackish water area (marshy lands) in 5 marine districts of Maharashtra State that could be ultimately converted into productive prawn/fish ponds in the State. However, as per the survey undertaken,

....2.

about 15,000 hectares land in pieces varying from 1 hectare to 150/200 hectares would be immediately available for acquaculture. Considering the relatively high tidal amplitude in the Maharashtra sector of the coast, brackish water ponds constructed in properly selected areas could be operated efficiently and profitably. However, very little progress has been made in making optimum use of this valuable natural resources largely because interested farmers did not have dependable technology either for economic pond construction or for profitable farming operations. Prawn seed, particularly of the Tiger prawn which is in great demand for farming, has not been available in the State in adequate number and some of the enterprising prawn farmers have been procuring the same in little quantity at exorbitant cost from far off places like Calcutta or Kakinada with great difficulty and yet incurring heavy mortality during long distance transportation. Considering this fact, the Government is setting up brackish water prawn hatchery on 58 hectares at BadapoKharan, District Thane with the help of expert consultant, from Kerala. Similarly brackish water fish farm is also being set up at Asangaon, District Thane. The hatchery at Badapokharan on its completion will produce 35 million prawn seed every year.

3. With the increasing demand for prawns for the export market, interest in prawn farming rapidly grew. A number of private enterprenours have also started prawn farming in Maharashtra, while several others have approached the Government for facilities for starting large-scale prawn farming in the State. The question of allotting the Government marshy lands to the private parties for developing prawn fish culture was under consideration of Government for

....3.

some time past.

RESOLUTION: On careful consideration of the pros and cons involved in the issue, Government has decided to allot the Government marshy lands on lease to the following four categories of beneficiaries:

i) Individuals belonging to fishermen community and weaker sections shall be granted upto 5 hectares each preferably in the vicinity of one km. of fishing gaothans and requiring low construction cost.

ii) Cooperative Societies of fishermen shall be granted upto 25 hectares each.

iii) Small Entrepreneurs having technically and financially sound schemes shall be granted land upto 5 hectares each.,

For this purpose, applicant having a financial capacity to invest 5% from his own sources, of the total estimated expenditure on the project, shall be deemed to be small Entrepreneur.

iv) Big Entrepreneurs having good bankable projects, stabilised organisation, having technical know-how will be considered for allotment of land upto 50 hectares each., In exceptional cases, Government may consider allotment of land in excess of 50 hectares, depending on merits of each case.

For this purpose, the applicants including limited companies with sound financial status and in a position to invest 20% from their own sources, of the total estimated expenditure [illegible] project, shall be

.....4.

Scanned with CamScanner

deemed to be Big Entrepreneurs.

3. The lands will be given on lease broadly on the following terms and conditions:

a) The lease period shall be 30 years;

b) Three months' notice to terminate the lease shall be given by either side;

c) Big Entrepreneurs will have to encourage local employment by training and absorbing local candidates, especially those belonging to fishermen community and weaker sections;

d) Big entrepreneurs will not be allowed to collect seed from the natural sources as far as possible;

e) Government reserves the right to withdraw the land by giving 3 months' notice, if, it is observed that:

i) no sincere and tangible efforts have been and/or are being made by the lessee to put the land to the contemplated use.

ii) the lessee fails to develop at least one third of the area leased within a period of 2 years and the entire area within a period of 5 years, from the date of taking over the possession of the land on its allotment.

f) The lease rent will be charged as follows:-

| | | Rate per hectare per year |
|---|---|---|
| 1) Individuals from Fishermen community/weaker sections. | Upto 5 ha | Rs.10 |
| 2) Cooperative Societies of fishermen. | Upto 10 ha | Rs.10 |
| 3) Small Entrepreneurs | Upto 5 ha | Rs.20 |
| 4) Big Entrepreneurs | Upto 10 ha | Rs.50 |

These rates will be reviewed after every 10 years.

The general terms and conditions normally imposed by the Revenue and Forests Department while leasing lands, will also be made applicable.



Scanned with CamScanner

3. Those interested in having Government marshy lands on lease for undertaking brackish water fish farming, should apply in writing along with detailed project proposals to the Director of Fisheries, Maharashtra State, Taraporwala Acquarium, Bombay-2 who will also give technical guidance to the individuals/parties in case they approach him. The proposals so received will be scrutinised and recommended to Government in Agriculture and Cooperation Department(ADF) by the Director of Fisheries, after getting the remarks of the Collectors of the respective districts, thereon. The proposals so recommended will be approved by the Agriculture and Cooperation Department(ADF) and passed on to the Revenue and Forests Department for issue of formal orders, leasing out lands to the concerned parties. In pursuance of the orders to be issued by the Revenue and Forests Department, the concerned Collectors will take further steps necessary for leasing out lands.

4. These orders are issued with the concurrence of the Revenue and Forests Department and Finance Department vide Finance Department's u.o.r. No.702/EXP-14 dated the 15th June, 1985.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

(P. V. Kordo)
Deputy Secretary to Government.

Asstt. Director of Fisheries
(Brackish Water), Bombay

To

The Accountant General-I, Maharashtra, Bombay.

The Secretary, Government of India, Ministry of Agriculture and Rural Development, (Department of Agriculture and Cooperation). New Delhi.

The Director of Fisheries, Maha[illegible]tra State, Bombay,

The Commissioner, Bombay Divisi[illegible], Bombay,

....6.

The Commissioner, Bombay Municipal Corporation,
Bombay,
The Collectors, Bomb[illegible]/Th[illegible]/[illegible]/Raigad and
[illegible]indhudurg,
The Chief Executive Officers, Zilla Parishads,
Thane/Ratnagiri/Raigad/Sindhudurg
Regional Deputy Director of Fisheries,
Bombay Region, Bombay,
The Assistant Director of Fisheries, Bombay/Thane/
(Palghar)/Alibag(Raigad)/Ratnagiri/Sindhudurg
(Malvan),
The Managing Director, Maharashtra Rajya Machhimar
Sahakari Sangh, Bombay,
The Managing Director, Thane District Madhyavarti
Machhimar Sahakari Sangh, XXXXX, Thane,
The Managing Director, Raigad District Madhyavarti
Machhimar Sahakari Sangh, Alibag,
The Managing Director, Ratnagiri District Madhyavarti
Machhimar Sahakari Sangh, Ratnagiri,
The General Administration Department,
The Finance Department,
The Revenue and Forests Department,
The Rural Development Department,
The Agriculture and Cooperation Department(Agri.)
The Agriculture and Cooperation Department(Coop.)
The Irrigation Department,
Personal Secretary to Chief Minister,
Personal Secretary to Minister(Fisheries),
Personal Secretary to Minister of State(Fisheries),
Director of Information and Publicity, Maharashtra
State, Bombay with a request to issue press note.
District Publicity Officer, Bombay/Raigad/Ratnagiri/
Thane/Sindhudurg.(with a request to give publicity
publicity in local newspapers).

B E.

क्रमांक : निखायो-१४९२/प्र.क्र ३४३/९२/पदुम-
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : 12 ऑक्टोबर, १९९३

प्रति,

मत्स्यव्यवसाय संचालक,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई

विषय : मत्स्यव्यवसाय शेतीसाठी खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबत..

संदर्भ : शासनाचे समक्रमांकाचे दिनांक २८ सप्टेंबर १९९२ चे अपर मुख्य सचिव [महसूल विभाग] यांना लिहिलेले पत्र [प्रत जोडली आहे]

उपरोक्त विषयावरील शासनाचे पहिले आदेश शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग, क्रमांक: एफडीएक्स-१४८४/सीआर-१८०/एडीएफ-१२, दिनांक २४ जून १९८५ अन्वये निर्गमित करण्यांत आले आहेत. त्यांत शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.मत्स्यवि-१४८०/प्र.क्र.३/पदुम-१२, दिनांक २९ ऑगस्ट १९९० अन्वये सुधारणा करण्यांत आली आहे. दरम्यानच्या काळात मंत्रीमंडळाने यासंबंधात घेतलेल्या निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

२. महसूल विभागाने या प्रकरणी भाडे पट्टीचे दर खालीलप्रमाणे सुधारण्याचा निर्णय घेतलेला आहे :-

| | प्रचलित दर | सुधारित दर | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रिमियम | भुईभाडे प्रति हेक्टर | |
| १] मच्छिमार समाजातील व्यक्तीला जमीन दिल्यास | रु.१०/- | प्रति हेक्टरी रु.१५,०००/- | १ ते ५ वर्षे | रु. १००० |
| २] मत्स्यव्यवसायिकांच्या सहकारी संस्थेला | रु.१०/- | | ६ ते १० वर्षे | रु. २००० |
| ३] छोटे उद्योजक | रु.२०/- | | ११ ते १५ वर्षे | [illegible] |
| ४] मोठे उद्योजक | रु.५०/- | | १६ ते २० | [illegible] |
| | | | २१ ते २५ | [illegible] |
| | | | २६ ते ३० वर्षे | रु. ६००० |

Scanned with CamScanner

-२-

२. निमखाऱ्या पाण्यात मत्स्यशेतीसंदर्भात शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयात धोरणात्मक बदल घडवून आणणे गरजेचे आहे. म्हणून माजी सचिव [पदुम] यांनी आपणास यासंदर्भात एक स्वयंस्पष्ट प्रस्ताव सादर करण्याची विनंती केली होती. सदर प्रस्ताव या विभागास १५ ऑक्टोबर १९९२ पूर्वी प्राप्त होईल असे कृपया पहावे.

[ द. शि. फाटक ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

दिनांक 2 OCT 1992

निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबत शासकीय धोरण

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक निखायो १४९२/ प्र.क्र.१६३/ पदुम-१२
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२,
दिनांक :- २३ नोव्हेंबर,२००१

वाचा:- १)शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्रमांक एफडीएवस -१४८४/ सीआर १८०/पदुम-१२, दि.२४ जून,१९८५

२) शासन पत्र महसूल व वन विभाग पत्र क्रमांक संकीर्ण १०९२/प्र.क्र.९३/ज-१ ,दि.१९ जून,९२.

३) शासन ज्ञापन महसूल व वन विभाग क्र.जमीन २७९१/प्र.क्र.१५६/ज-४,दि.१४/१२/१९९४

प्रस्तावना :-

भारतातील बऱ्याच राज्यात निमखारे पाणी, मत्स्यसंवर्धन पारंपारिक पध्दतीने प्रचलित आहे. अलिकडे कोळंबीला परदेशातून येणाऱ्या वाढत्या मागणीमुळे व समुद्रातून मिळणाऱ्या उत्पादनामुळे निमखारे पाणी मत्स्यसंवर्धनातून कोळंबी उत्पादन वाढविणे ही काळाची गरज बनली आहे. तथापि राज्यात उपलब्ध असलेल्या खाजण जमिनीचा योग्य प्रकारे मत्स्य शेतीसाठी उपयोग होऊ शकलेला नाही. कारण यासंबंधीचे आवश्यक ज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, देशात उपलब्ध असलेल्या खाजण जमिनी या उपक्रमाखाली आणण्याचे धोरण शासनाने यापूर्वीच निश्चित केलेले आहे. त्यानुसार खाजणजमिनीचे वाटप व प्रिमियम व भाडे पट्टीचे दर यापूर्वी ठरविण्यात आले होते. परंतु, बदलत्या काळानुसार त्यामध्ये करावयाच्या बदलाबाबत विचार करुन खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबतचे सुधारीत धोरण ठरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- सदर प्रस्तावावर शासनाने सर्वतोपरी विचार करुन निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय जमिनी भाडेपट्टयाने देण्याबाबतचे शासकीय धोरण खालीलप्रमाणे ठरविण्याचा निर्णय घेतला आहे :-

१) प्रत्येक गावातील उपलब्ध खाजण जमिनीपैकी २५% जमिन इतर कामासाठी राखून ठेवल्यानंतर उरलेल्या जमिनीपैकी ६०% खाजण जमिन वैयक्तिक अर्जदार व मच्छिमारांची सहकारी संस्था व इतर संस्था यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावी व ४०% खाजण जमिन लहान उद्योजक व मोठे उद्योजक यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावी. अशा प्रकारे आरक्षण प्रत्येक खेडयाप्रमाणे निश्चित करण्यात यावे. तथापि एकूण जमीनीची उपलब्धता लक्षात घेता, एखाद्या खेडयामधील संपूर्ण क्षेत्र एका वर्गासाठी संपूर्णपणे राखून ठेवण्यास हरकत नसावी. परंतु उपलब्ध क्षेत्रापैकी ६०:४० आरक्षणाचे प्रमाण [illegible]

Scanned with CamScanner

२) खाजण जमिन भाडेपट्टीने देण्याकरिता प्रिमियम आणि भाडेपट्टीच्या दरात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे:-

| अ.क्र. | लाभधारक | प्रिमियम (प्रती हेक्टर) (रुपये) | वार्षिक भाडेपट्टी दर (प्रती हेक्टर) (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | परंपरागत मच्छिमार व्यवसाय करणारे वैयक्तिक अर्जदार | ५,००० | १,००० |
| २ | मच्छिमार सहकारी संस्था | १०,००० | १,५०० |
| ३ | कंपनी / पार्टनरशिप फर्म्स व अन्य अर्जदार | २५,००० | २,००० |

भाडेपट्टीच्या दरामध्ये दर पाच वर्षांनी वर विहित करण्यात आलेल्या रक्कमेइतकी वाढ करण्यात यावी.

३. खाजण जमिन वाटपासाठी वैयक्तिक लाभार्थींच्या निवडीबाबत प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे राहिल :-

| लाभार्थीच्या निवडीसाठी प्राधान्य क्रमवारी | प्रवर्गामधील प्राधान्यक्रमवारी |
|---|---|
| १) ज्या भागात जमिनीचे वाटप करावयाचे आहे त्यांच गावातील अर्जदार | १) मच्छिमार समाजातील अर्जदार<br>२) अनुसूचित जाती/ जमाती / विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील अर्जदार |
| २) ज्या जिल्ह्यातील जमिनीचे वाटप करावयाचे आहे त्याच जिल्ह्यातील अर्जदार | ३) इतर मागासवर्गीय जातीमधील अर्जदार<br>४) माजी सैनिक<br>५) सुशिक्षित बेरोजगार अर्जदार<br>६) इतर अर्जदार |

४) वैयक्तिक अर्जदारांसाठी उपलब्ध खाजण जमिनीपैकी ४/५ जमीन स्थानिक लोकांसाठी म्हणजे सदर क्षेत्र उपलब्ध असलेल्या जिल्ह्यातील लोकांसाठी राखून ठेवण्यात यावे व १/५ क्षेत्र इतर जिल्ह्यातील अर्जदारांना वाटपाकरिता उपलब्ध करण्यात यावी.

५) सुधारीत निर्णयानुसार वैयक्तिक अर्जदारांना कमाल ५ हेक्टरपर्यंत खाजण जमिनीचे वाटप करण्यात येईल व सहकारी संस्था तसेच इतर संस्था, कंपनी व उद्योजक यांना कमाल वाटप ३० हेक्टरपर्यंत करण्यात येईल. एकत्रित प्रकल्पाकरिता अतिरिक्त ५ हेक्टरपर्यंत जमिन वाटप करण्यात येईल.

Scanned with CamScanner

६) मत्स्य शेतीसाठी खाजण जमिन मिळणेबाबतच्या अर्जांच्या पडताळणीसाठी पुढील कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी :-

१. अर्जदाराने आवश्यक अर्ज जिल्हयाच्या निमखारे पाणी मत्स्य संवर्धन विकास यंत्रणेकडे सादर करावा. अर्जासोबत प्रकल्प अहवाल, त्याचे तांत्रिक /आर्थिक वर्धन क्षमता इत्यादीचा सविस्तर तपशील अर्जदाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. निमखारे पाणी मत्स्य संवर्धन विकास यंत्रणेने अर्जाची तपासणी करुन प्रकल्पाची वर्धन क्षमता तसेच अर्जदाराची आर्थिक क्षमता अजमावून सक्षम प्राधिका-याकडे तो अर्ज पाठवावा.

२. निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेकडे अर्ज प्राप्त झाल्यावर इतर तांत्रिक/प्रशासकीय बाबींसह पुढील बाबींची तपासणी करावी :-

(अ) अर्जदाराने मागणी केलेली जमिन कोळंबी संवर्धनासाठी उपयुक्त आहे किंवा कसे.

(ब) अर्जदाराने मागणी केलेली जमिन वाटपासाठी उपलब्ध आहे किंवा कसे

(क) अर्जदारांची कोळंबी संवर्धनाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे का व तसेच त्याबद्दलची तांत्रिक माहिती ही आहे किंवा कसे

(ड) अर्जदारास राज्यामध्ये दुस-या अन्य ठिकाणी कोळंबी संवर्धनासाठी शासकीय खाजण जमिनीचे वाटप करण्यात आले आहे किंवा कसे

(इ) प्रकल्प अहवालाची व अर्जदाराची तांत्रिक / आर्थिक क्षमतेची विस्तृत तपासणी करावी. अर्जदारास निमखारे पाणी मत्स्य संवर्धन विकास यंत्रणेकडून सवलती मिळणार असल्यामुळे सदर यंत्रणेच्या तांत्रिक अधिकारी वर्गाकडून प्रकल्पाच्या सक्षमतेची तपासणी करण्यात यावी.

७) खाजण जमिन मत्स्य शेतीसाठी भाडेपट्टयाने देण्याबाबत सर्व साधारण अटी व शर्ती परिशिष्ट- अ मध्ये दिलेल्या आहेत. त्यातील अटींचे पालन न केल्यास किंवा कोणत्याही अटींचा भंग केल्याचे आढळल्यास कारणे दाखवा नोटिस किंवा पुर्व सूचना देऊन भाडेपटट्याचा करार रद्द करण्याचा अधिकार जमिन वाटप करणा-या सक्षम प्राधिका-यास राहील.

८) खाजण जमिनीचे क्षेत्रनिहाय वाटपास मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त/ शासन असे त्रिस्तरावर ठेवण्यात आले आहेत. जमिन वाटपाबाबत २० हेक्टरपर्यंतचे अधिकार जिल्हाधिकारी यांना, ५० हेक्टरपर्यंतचे अधिकार विभागीय आयुक्त यांना व ५० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रासाठी जमिन वाटपाचे अधिकार शासनाकडे राहील. जिल्हाधिकारी व आयुक्त यांना प्रदान करावयाच्या अधिकाराबाबतचे आवश्यक आदेश महसूल व वन विभागामार्फत निर्गमित करण्यात येतील.

Scanned with CamScanner

२. हे आदेश महसूल व वन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्र.१६९४६/व्यय -१ दिनांक २८/८/२००१ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सहपत्र : परिशिष्ट-अ

( श्री. ना. थकाते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव
आयुक्त ,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
विभागीय आयुक्त, मुंबई
आयुक्त,मुंबई महानगर पालिका, मुंबई
जिल्हाधिकारी, मुंबई / मुंबई उपनगर / ठाणे/ रायगड / रत्नागिरी/ सिंधुदुर्ग
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक कोकण विभाग, मुंबई
सहायक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई / ठाणे- पालघर/ रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघ , मुंबई
व्यवस्थापकीय संचालक ठाणे जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ, ठाणे
व्यवस्थापकीय संचालक रायगड जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ, अलिबाग
व्यवस्थापकीय संचालक रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ, रत्नागिरी
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई
प्रधान सचिव, महसूल ,मंत्रालय
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय
सचिव, ग्राम विकास विभाग. मंत्रालय
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
सर्व कक्ष अधिकारी, (पदुम कक्ष) कृषि व पदुम विभाग,मंत्रालय
निवड नस्ती.

Scanned with CamScanner

शासन निर्णय क्रमांक निद्यायो १४९२/ प्र.क्र.१६३/ पदुम-१२, दिनांक२३नोव्हेंबर,२००१ चे सहपत्र
परिशिष्ट अ

## खाजण जमिन मत्स्य शेतीसाठी भाडेपट्टीने देण्यासाठीच्या साधारण अटी व शर्ती

१. मोठ्या उद्योजकांना जमिन देतांना त्यांनी स्थानिक, विशेषतः मच्छिमार समाजातील व दुर्बल गटातील लोकांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देऊन त्यांना उद्योग धंद्यात / नोकरीत सामावून घेण्याची अट राहील.

२. मोठ्या उद्योजकांना शक्य तो मत्स्य बीज नैसर्गिक स्थानातून गोळा करण्यांस परवानगी देण्यात येऊ नये.

३. भाडेपट्ट्रीचा एकूण कालावधी ३० वर्षाचा असेल.

४. तीन महिन्याची नोटीस देऊन भाडेपट्टीचा करार रद्द करावा व त्यातून मुक्त होण्याचे स्वातंत्र्य शासनास व पट्टाधारकांस राहील.. ज्या कामाकरिता जमिन दिली आहे त्या कामाकरितापट्टेधारकांनी प्रामाणिकपणें व ठळकपणें दिसतील असे प्रयत्न केले नाहीत वा करीत नाहीत असे दिसून आले तर तीन महिन्याची नोटीस देऊन जमिनीचा ताबा परत घेण्याचे अधिकार शासनास राहील.

५. जमिनीचे वाटप होऊन जमिन भाडेपट्टीने ताब्यात मिळाल्यावर दोन वर्षाच्या कालावधीत जर दिलेल्या क्षेत्राच्या १/३ भागात व ५ वर्षाच्या कालावधीत संपूर्ण जमिनीचा विकास संबंधित पट्टाधारकाने केला नाही तर दिलेली जमिन परत ताब्यात घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

६. जमिन मंजूर करतांना महसूल व वन विभागांने विहित केलेल्या इतर सर्व साधारण अटी बंधनकारक राहतील.

७. जमिनीचे प्रिमियमचे व भाडेपट्टीचे दर या शासन निर्णयाच्या परिच्छेद २ प्रमाणे राहतील.

८. भुईभाडयाच्या दरामध्ये दर पाच वर्षांनी सुधारणा करण्यात येईल.

९. भाडेपट्ट्याधारकाला जमिन किंवा त्याचा काही भाग शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय पोट भाडयाने देता येणार नाही / तारण ठेवता येणार नाही किंवा सदर जमिनीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही.

१०. जिल्हाधिका-याच्या पूर्व परवानगीशिवाय भाडेपट्ट्याधारकाने जमिनीवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम उदा. शेडस्, चौकीदाराचे वास्तव्यगृह इत्यादी बांधू नये. तसेच त्यासाठी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता व त्याखालील नियमामधील तरतूदीनुसार आवश्यक तो बिगर शेती परवाना भाडेपट्ट्याधारकाने जिल्हाधिका-यांकडून मिळविला पाहीजे.

११. प्रिमियमच्या रक्कमेत तसेच वार्षिक भुईभाडयाच्या दरात शासनाने सुधारणा केल्यास सुधारीत दराने प्रिमियम व भुईभाडे देण्याचे बंधन पट्टेधारकावर राहिल.

Scanned with CamScanner

शासकीय खाजण जमिन ज्यांना भाडेपट्टीने दिली जाईल त्यांना मत्स्योद्योगासाठी वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यासाठी त्यांच्या विनंतीनुसार सदरची जमिन तारण ठेवण्यास परवानगी देता येईल मात्र, परवानगी, अशा जमिनीची केवळ भाडेपट्टीचे हक्क तारण ठेवण्यापुरते मर्यादित राहील. त्याकरिता खालील अटी व शर्ती च्या अधिन राहून मान्यता देण्यात यावी.

अ) पट्टेदारानी त्यांची स्वतःची मालमत्ता प्रथमतः वित्तीय संस्थेकडे तारण ठेवणे आवश्यक राहील व त्यांनी भाडेपट्टीने धारण केलेल्या शासकीय खाजण जमिनी या केवळ अनुषंगिक प्रतिभूती (कोलॅटरल सिक्युरिटी) म्हणून राहतील.

ब)(१) पट्टेदारांची मालमत्ता जप्त करण्याचा प्रसंग उद्भवल्यास धनको वित्तीय संस्था भाडेपट्ट्याच्या मुळ अटी व शर्तीवर भाडेपट्टीच्या उर्वरीत कालाकरिता शासनाचे पट्टेदार या नात्याने शासकीय जमिन ताब्यात घेऊ शकेल.

(२) ज्या प्रयोजनासाठी या जमिनी मुळ पट्टेदारास दिल्या आहेत त्याच प्रयोजनासाठी त्याचा पुढे वापर करणे आवश्यक राहील.

क) पट्टेदाराच्या कर्ज फेडीच्या कसुरीबद्दल वित्तीय संस्थेने शासकीय जमीन ताब्यात घेतल्यास ती जमीन दुस-या व्यक्तीला /संस्थेला /उद्योजकाला भाडेपट्टीच्या उर्वरीत कालावधीसाठी शासनाच्या परवानगीने भाडेपट्टीने दिल्यास पोट भाडेपट्ट्याव्दारे होणाऱ्या अनर्जित उत्पन्नातील ५०% हिस्सा शासनास द्यावा लागेल.

१३. उपरोक्त अटीचे पालन न केल्यास किंवा कोणत्याही अटीचा भंग केल्याचे आढळल्यास कारणे दाखवा नोटिस किंवा पुर्व सूचना देऊन भाडेपट्ट्याचा करार रद्द करण्याचा अधिकार जमिन वाटप करणा-या सक्षम प्राधिका-यास राहील.

Scanned with CamScanner

" निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी
शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबत
शासकीय धोरण - सुधारणा.

महाराष्ट्र शासन,
कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- निखायो-२००४/प्र.क्र.३१/पदुम १२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांक : १३ ऑगस्ट, २००४.

वाचा :- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.निखायो-१४९२/प्र.क्र.१६३/पदुम-१२, दि. २३.११.२००१.
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक निखायो-१४९२/प्र.क्र.१६३/पदुम १२, दि.१५.३.२००३.
३) ) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक निखायो-१४९२/प्र.क्र.१६३/पदुम १२, दि.२०.१०.२००३.

शासन निर्णय :-

कृषि व पदुम विभागाच्या निखायो-१४९२/प्र.क्र.१६३/पदुम-१२, दिनांक २३ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णयामध्ये निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबतचे धोरण जाहीर करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयामध्ये परिच्छेद-२ मधील अनु.१ च्या वर्गवारीमध्ये लाभधारक हे 'पारंपारिक मच्छिमार व्यवसाय करणारे वैयक्तिक अर्जदार तसेच मत्स्यव्यवसायातील पदवीधर/पदव्युत्तर पदवी धारक करणार व निमखारे पाणी कोळंबी संवर्धन प्रशिक्षण प्राप्त केलेले युवक' असावेत असा समक्रमांक दिनांक १५.३.२००३ च्या शुद्धिपत्रकान्वये निश्चित करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयात 'कोकण रेल्वे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त तसेच इतर प्रकल्पग्रस्त' या प्रवर्गाचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत आता शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

१) मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याकरिता शासन निर्णय दिनांक २३ नोव्हेंबर, २००१ परि-२ मधील अनुक्रमांक १ च्या प्रवर्गामध्ये दिनांक १५ मार्च, २००३ च्या शुद्धिपत्रान्वये समाविष्ट केलेल्या लाभधारकांच्या यादीमध्ये "<u>निमखारे पाणी कोळंबी संवर्धन प्रशिक्षण प्राप्त केलेले युवक</u>" या पुढे "कोकण रेल्वे प्रकल्पामधील प्रकल्पग्रस्त व इतर प्रकल्पग्रस्त" या प्रवर्गाचा समावेश करण्यात यावा व त्यानुसार संबंधित जमिनीचे प्रीमियम व वार्षिक भाडेपट्टीची आकारणी करण्यात यावी. संदर्भाधिन दिनांक २३ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णयामधील अन्य तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(गो. भ. शिंदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री ( मत्स्य) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री/राज्यमंत्री (सर्व)
मा.मुख्यसचिव

Scanned with CamScanner

आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विभागीय आयुक्त, मुंबई
आयुक्त मुंबई महानगरपालिका,मुंबई.
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर /ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, कोकण विभाग, मुंबई
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई/ठाणे,पालघर/रायगड, रत्नागिरी,सिंधुदूर्ग
महालेखापाल,महाराष्ट्र-१, मुंबई
प्रधान सचिव, महसूल विभाग,मंत्रालय
प्रधान सचिव, नियोजन विभाग,मंत्रालय
प्रधान सचिव, वित्त विभाग,मंत्रालय
प्रधान सचिव, पर्यावरण विभाग,मंत्रालय
प्रधान सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,मंत्रालय
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबइ
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघ, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, ठाणे जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, रायगड जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ,मुंबई
सर्व कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवडनस्ती, पदुम-१२.

Scanned with CamScanner

निमखा-या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याबाबत शासकीय धोरण- सुधारणा

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
पूरक पत्र क्रमांक निखायो १४९२/प्र.क्र. १६३/पदुम १२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ मार्च, २००३

पहा : शासन निर्णय ,कृषि व पदुम विभाग क्र. निखायो १४९२/प्र.क्र. १६३/पदुम १२, दि. २३ नोव्हेंबर, २००१

पूरक पत्रक :- कृषि व पदुम विभागाच्या समक्रमांक दिनांक २३ नोव्हेंबर २००१ च्या शासन निर्णयान्वये निमखा-या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टयाने देण्याबाबतचे शासकीय धोरण जाहीर करण्यात आलेले आहे. शासनाकडे उपलब्ध असलेली खाजण जमिन कोळंबी संवर्धनाकरिता भाडेपट्टीने वाटप करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार लाभार्थीकडून आवश्यक तो प्रतिसाद मिळत नाही. खाजन जमिनीचे वाटप भाडेपट्टीने केल्यास शासनाच्या महसूलात वाढ होईल. तसेच, याद्वारे मत्स्यव्यवसायात खाजगी गुंतवणूक वाढेल व पर्यायाने पाण्यातील संवर्धनासाठी येईल या सर्व बाबींच्या व खाजण जमिन वाटपात येणा-या विविध अडीअडचणींचा विचार करुन वरील शासन निर्णयामधील खालील परिच्छेदामध्ये अंशतः बदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) शासन निर्णय दिनांक २३.११.२००१ मधील परिच्छेद - १. मधील सध्याच्या मजकूराऐवजी खालीलप्रमाणे सुधारित मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-

प्रत्येक गावातील उपलब्ध खाजण जमिनींपैकी २५ टक्के जमिनी इतर कामासाठी राखून उरलेल्या जमिनींपैकी ६० टक्के खाजण जमिन वैयक्तीक अर्जदार व मच्छिमारांची सहकारी संस्था व इतर संस्था यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावी. याबाबत वैयक्तीक अर्जदार व मच्छिमार सहकारी संस्था यांचा प्रतिसाद अत्यल्प आल्यास इतर प्रवर्गातील लाभधारकांचा विचार करण्यात यावा. ४० टक्के जमिन लहान उद्योजक व मोठे उद्योजक यांच्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावी. अशा प्रकारे आरक्षण प्रत्येक खेडयाप्रमाणे निश्चित करण्यात यावे. तथापि एकूण जमिनींची उपलब्धता लक्षात घेता एखाद्या खेडयामधील संपूर्ण क्षेत्र एका वर्गासाठी संपूर्णपणे राखून ठेवण्यात हरकत नसावी. परंतु उपलब्ध क्षेत्रापैकी ६० : ४० आरक्षणाचे प्रमाण संपूर्ण जिल्हयासाठी अंमलात आणणे इष्ट राहील.

२) शासन निर्णय दिनांक २३.११.२००१ मधील परिच्छेद २ मधील सध्याच्या मजकूराएवजी खालीलप्रमाणे सुधारित मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-

खाजण जमिन भाडेपट्टीने देण्याकरिता प्रिमियमच्या व भाडेपट्टीच्या दरात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली.

| अ.क्र. | लाभधारक | प्रिमियम (प्रतिहेक्टर) रुपये | वार्षिक भाडेपट्टी दर (प्रति हेक्टर ) रुपये |
|---|---|---|---|
| १ | पारंपारिक मच्छिमार व्यवसाय करणारे वैयक्तीक अर्जदार/ तसेच मत्स्यव्यवसायातील पदवीधर / पदव्युत्तर पदवी/ निमखारे पाणी कोळंबी संवर्धन प्रशिक्षण प्राप्त केलेले युवक | ५,००० | १,००० |
| २ | मच्छिमार सहकारी संस्था | १०,००० | १,५०० |
| ३ | कंपनी/पॅटर्न शिप फर्मस् व अन्य अर्जदार | २५,००० | २,००० |

Scanned with CamScanner

प्र आयुक्त मत्स्यव्यवसाय

निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी
शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्यासाठी
अधिकार प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : जमीन १०/२००२ / प्र.क्र. ३१०/ ज-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ११ मार्च, २००२.

(निपक्ष)

वाचा: शासन निर्णय कृषि व पदुम विभाग, क्रमांक निखायो १४९२ / प्र.क्र.१६३ / पदुम - १३, दिनांक २३ नोव्हेंबर, २००१

शासन निर्णय:-

शासन निर्णय,कृषि व पदुम क्रमांक निखायो १४९२ / प्र.क्र.१६३ / पदुम - १२, दिनांक २३ नोव्हेंबर, २००१ अन्वये निमखाऱ्या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्टीने देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार खाजण जमीन वाटपास मंजुरी देण्याचे अधिकार खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत : -

| अ.क्र. | सक्षम प्राधिकारी | वाटप मंजुरी कमाल क्षेत्र |
|---|---|---|
| १ | संबंधीत जिल्हाधिकारी | २० हेक्टर पर्यंत |
| २ | विभागीय आयुक्त | ५० हेक्टर पर्यंत |
| ३ | शासन | ५० हेक्टर पेक्षा जास्त |

२. वरील प्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे विल्हेवाट) नियम, १९७१ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आयुक्त, मत्स्यव्यवसाय
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
१९ मार्च 2002
नोंद १२६

(रा.शं.नागरे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग,

प्रति,
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा.मंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव

03

C:\WINDOWS\...\RAFI

कार्यविवरण नोंदणी क्रमांक

90310
9/03/02